MHWS100007542023

| | | | | |
|---|---|---|---|---|
| दाखल तारीख | : | २६.०४.२०२३. | | |
| नोंदणी तारीख | : | २६.०४.२०२३. | | |
| निकाल तारीख | : | ०५.०५.२०२६. | | |
| कालावधी | : | वर्षे | महिने | दिवस |
| | | ०३ | ०० | ०९ |

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी (न्यायालय क्र.२) मालेगांव, तालुका मालेगांव,**
**जिल्हा वाशिम यांचे न्यायालयात**
**( पीठासीन अधिकारी : अ. सु. कोष्टी )**

**<u>नियमित फौजदारी प्रकरण क्र. ८४/२०२३</u>**
**<u>निशाण क्र. २९</u>**

**गुन्हा नोंद क्र. २२८/२०२२.**

**फिर्यादी/तक्रारदार** **महाराष्ट्र शासन मार्फत पोलीस निरीक्षक,**
**<u>जऊळका</u> पोलीस स्टेशन,** ता. मालेगांव, जि. वाशिम.

| | | |
|---|---|---|
| **अभियोग पक्षातर्फे** | | सहाय्यक सरकारी अभियोक्ता<br>**सौ.एस.पी.सरकटे.** |
| **आरोपीं** | १. | **संघदिप मनोहर गुडदे,** वय वर्षे २६, |
| | २. | **जयसेन प्रल्हाद गुडदे,** वय वर्षे २३, |
| | ३. | **रमेश सोपान लबडे,** वय वर्षे २२,<br>सर्व राहणार- बोरगांव, ता. मालेगांव जि. वाशिम. |
| **आरोपींतर्फे विधीज्ञ** | | **श्री.के.एन.साळुंखे.** |

**<u>भाग – ब</u>**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | : | ०३.१०.२०२२ |

| | | |
|---|---|---|
| फिर्याद दाखल दिनांक | : | ०४.१०.२०२२ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | : | ०२.०३.२०२३. |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | : | ०९.०९.२०२५. |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | : | १६.०३.२०२६. |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | : | -- |
| न्यायनिर्णय दिनांक | : | ०५.०५.२०२६. |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | : | निरंक, आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात येते. |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्र. | आरोपींचे नांव | अटक/नोटीस दिनांक | जामिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (**set off**) करण्याबाबत कलावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | संघदिप मनोहर गुडदे, | ०८.१०.२०२२ | ०९.०९.२०२५ | ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ भा.दं.वी. प्रमाणे | निर्दोष मुक्त | निरंक | निरंक |
| २. | जयसेन प्रल्हाद गुडदे, | ०८.१०.२०२२ | ०९.०९.२०२५ | | | | |
| ३. | रमेश सोपान लबडे, | ०८.१०.२०२२ | ०९.०९.२०२५ | | निर्दोष मुक्त | निरंक | निरंक |

## भाग – क

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)

**सरकारपक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/ न्यायालयीन साक्षीदार**

**अ. अभियोगपक्ष -**

| सा.क्र. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | राहुल शिवाजी शितोळे | फिर्यादी | २० |
| २. | प्रदीप नारायण शिंदे | साक्षीदार | २१ |

**ब. आरोपीतर्फे साक्षीदार**

| सा.क्र. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| -- | -- | -- | -- |

**क. न्यायालयामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | १ | दोषारोपपत्र |

## न्यायनिर्णय

**( आज दिनांक दि.०५.०५.२०२६ ई. रोजी घोषीत )**

प्रस्तुत प्रकरणी आरोपींविरुध्द भारतीय दंड संहितेचे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, ३४ अन्वये पात्र गुन्हा केलेच्या आरोपाखालील खटल्यास सामोरे जात आहे.

**अभियोगपक्षाचे म्हणणे थोडक्यात खालील प्रमाणे आहे**.

०२. फिर्यादी नामे राहुल शिवाजी शितोळे यांनी पोलिस स्टेशन, जऊळका येथे फिर्याद दिली की, दिनांक ०३.१०.२०२२ रोजी सायंकाळी ०८.०० वाजताचे सुमारास फिर्यादीचा चुलत भाऊ राहुल दादाराव शितोळे हा जोंगी एरिया मध्ये असतांनी फिर्यादीच्या गावातील आरोपी संघदिप मनोहर गुडदे, जयसेन प्रल्हाद गुडदे व प्रदीप सोपान लबडे हे तिघे तिथे आले व विनाकारण दारू पिवून शिवीगाळ केली तेव्हा फिर्यादीचा चुलत भाऊ राहुल दादाराव शितोळे त्यांना *तुम्ही मला शिवीगाळ का करता* असे म्हणाला. त्यावर सर्व आरोपी काठी घेवुन फिर्यादीचे चुलत भावाला मारण्यास आले त्यावेळी फिर्यादी भांडण सोडविण्यास गेला असता आरोपी जयसेन गुडदे याने त्याचे हातातील लाकडी काठी फिर्यादीचे डोक्यात मारली त्यामुळे फिर्यादीचे डोके फूटून रक्त निघाले. तसेच प्रदीप नारायण शिंदे हा मधस्थी करण्याकरीता आला असता त्याला पण आरोपी रमेश याने लाकडी काठीने डोक्यावर मारले त्यामुळे त्याचे देखील डोके फूटले. आरोपी संघदीप गुडदे याने फिर्यादीला व प्रदीप नारायण शिंदे यांना लाथाबुक्क्याने मारहाण केली व जिवाने मारण्याची धमकी दिली. त्यामुळे आरोपींच्या उपरोक्त कृत्यामुळे फिर्यादीने पोलीस ठाण्यात आरोपींविरुध्द तक्रार दाखल केली.

०३. सदर फिर्यादवरुन पोलीस ठाणे, जऊळका यांनी आरोपींविरुध्द भारतीय दंड संहितेचे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, ३४ अन्वये शिक्षेस पात्र गुन्ह्याच्या आरोपाखाली गुन्हा रजि. क्र.२२८/२०२२ दाखल केला. तपासाअंती आरोपींविरुध्द भारतीय दंड संहितेचे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, ३४ अन्वये गुन्हा केल्या प्रकरणी आरोपपत्र सादर करण्यात आले.

०४. त्यानंतर आरोपींविरुध्द निशाण क्र. ११ वर भारतीय दंड संहितेचे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र गुन्ह्यासाठी आरोप निश्चीत केले. आरोपींना ते मराठीत समजावून सांगितले असता आरोपींनी गुन्हा कबूल नसल्याचे

सांगून प्रकरणात सुनावणी घेण्याची मागणी केली.

०५. माझ्यासमोर उपस्थित झालेले मुद्दे व त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह खालील प्रमाणे देत आहे.

| मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. दिनांक ०३.१०.२०२२ रोजी सायंकाळी ०८.०० च्या सुमारास ग्राम बोरगांव येथे आरोपी क्र.२ व ३ यांनी फिर्यादी व प्रदीप नारायण शिंदे यांना लाकडी काठीने डोक्यात मारहाण करून दुखापत पोहोचविली, हे अभियोगपक्षाने सिध्द केले काय ? | : | **नकारार्थी** |
| २. आरोपी क्र.१ ने वर नमुद दिवशी, वेळी फिर्यादी व प्रदीप शिंदे यांना लाथाबुक्यानी मारहाण केली, हे अभियोगपक्षाने सिध्द केले काय ? | | **नकारार्थी** |
| ३. आरोपींनी संगनमत करून वर नमुद दिवशी, वेळी फिर्यादीला व त्यांचा चुलत भावाला शिवीगाळ केली, हे अभियोगपक्षाने सिध्द केले काय ? | : | **नकारार्थी** |
| ४. आरोपींनी संगनमत करून वर नमुद दिवशी, वेळी फिर्यादी व प्रदीप नारायण शिंदे यांना जीवे मारण्याची धमकी दिली, हे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | : | **नकारार्थी** |
| ५. काय आदेश ? | : | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक १ ते ४ च्या अनुषंगाने :-**

०६. प्रस्तुतचे मुद्दे एकमेकाशी निगडीत असल्यामुळे पुराव्यांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी ते एकत्रीत चर्चीले आहेत.

०७. अभियोगपक्षाने आपले म्हणणे सिध्द करणेसाठी फिर्यादी – राहुल शिवाजी शितोळे (अ.सा.क्र.१) यांची साक्ष निशाण क्र.२० वर नोंदवली आहे. त्यांच्या साक्षीमध्ये ते सर्व आरोपींना ओळखत असल्याचे, घटना अंदाजे तीन ते चार वर्षापुर्वी संध्याकाळी बोरगांव येथे घडल्याचे, त्यादिवशी त्यांची व आरोपींची बोलचाल झाल्याचे, याव्यतिरीक्त काही झाले

नसल्याचे, ते खाली पडल्यामुळे त्यांच्या डोक्याला लागल्याचे, त्यानंतर त्यांनी आरोपींविरुध्द रागाच्या भरात पोलीस ठाण्यात रिपोर्ट दिल्याचे, त्यावर त्यांचा निशाणी अंगठा आहे परंतु त्यातील मजकुर त्यांना माहित नसल्याचे कथन केले. फिर्यादी हा अभियोगपक्षास साथ देत नसल्यामुळे त्यांची उलटतपासणी घेण्यात आली. उलटतपासणीमध्ये फिर्यादीने दिनांक ०३.१०.२०२२ रोजी आरोपी जयसेन गुडदे व रमेश यांनी त्यांना व त्यांच्या चुलत भावाला लाकडी काठीने डोक्यात मारून जखमी केल्याचे, आरोपी संघदिप याने लाथाबुक्यांनी मारहाण करून आरोपींनी जिवे मारण्याची धमकी दिल्याचे तथ्य स्पष्टपणे नाकारले आहे. उलटतपासणीमध्ये विचारण्यात आलेल्या उत्तर सुचक प्रश्नांना फिर्यादीने नकारात्मक उत्तरे दिली. तसेच, फिर्यादीने आरोपींसोबत न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याची बाब मान्य केलेली आहे. त्यामुळे अभियोगपक्षाच्या कथनाला व पुराव्यास दुजोरा व पुष्टी देणारा सबळ पुरावा अभिलेखावर आलेला नाही.

०८.  तसेच प्रदीप नारायण शिंदे (अ.सा.क्र.२) यांनी त्यांच्या साक्षीत फिर्यादी हा त्यांच्या मामाचा मुलगा असल्याचे, ते सर्व आरोपींना ओळखत असल्याचे, घटना ही अंदाजे दोन ते तीन वर्षापुर्वी संध्याकाळी बोरगांव येथे घडल्याचे, त्यादिवशी त्यांच्या भावाची व आरोपींची बोलचाल झाल्याचे, याव्यतिरीक्त काही झाले नसल्याचे तसेच त्यावेळी ते मंदिरात गेल्याचे व त्यांचा पाय घसरल्यामुळे ते पडल्याचे कथन केलेले आहे. सदर साक्षीदार अभियोगपक्षास साथ देत नसल्यामुळे त्यांची उलटतपासणी घेण्यात आली. उलटतपासणीमध्ये विचारण्यात आलेल्या उत्तर सुचक प्रश्नांना साक्षीदार यांनी नकारात्मक उत्तरे दिली आहेत. तसेच, साक्षीदाराची आरोपींसोबत समजुत झाली आहे. त्यामुळे अभियोगपक्षाच्या कथनाला व पुराव्यास दुजोरा व पुष्टी देणारा सबळ पुरावा अभिलेखावर आलेला नाही.

०९.  एकंदरीत अभिलेखावरील दाखल साक्षीपुराव्याचे अवलोकन केले असता फिर्यादीची आरोपींसोबत तडजोड झाली असल्याचे नि.क्र. १९ वरील तडजोड नाम्यावरुन दिसुन येते. त्यामुळे नि.क्र. १ वर आदेश पारित करुन पुरावा बंद करण्यात आलेला आहे. या सर्व उणीवांमुळे अभियोगपक्षाचे कथित घटनेच्या कथनाविषयी शंका उपस्थित होते व त्याचबरोबर पुराव्याअभावी सदर कथन संशयापलिकडे सिध्द होणे हे अशक्यप्राय असल्याचे दिसुन येते. सबब, संपुर्ण पुरावा पहाता तो आरोपींविरुध्द निश्चीत केलेले दोषारोप शंकेपलिकडे सिध्द करण्यासाठी पुरेसा नसल्याचे दिसुन येते व त्याचबरोबर पुराव्याअभावी सदरची कथने

सिध्द होत नाहीत. सबब, मी मुद्दा क्र. १ ते ४ चे उत्तर नकारार्थी नोंदवत आहे.

**मुद्दा क्र. ५ च्या अनुषंगाने :–**

१०. मुद्दा क्र. १ ते ४ च्या नकारार्थी उत्तरादाखल आरोपींना भारतीय दंड संहितेचे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, ३४ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केलेच्या आरोपातून मुक्त करावे लागेल. प्रस्तुत प्रकरणामध्ये जप्त करण्यात आलेली काठी जीची लांबी अंदाजे ३ फुट ९ इंच व दुसरी काठी जीची लांबी अंदाजे ३ फुट ६ इंच मुल्यहीन असल्याने नाश करावा लागेल. उपरोक्त सर्व कारणांस्तव मी मुद्दा क्र.५ चे उत्तर त्याप्रमाणे दिलेले आहे व खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१. आरोपी **क्र. १ ते ३ संघदिप मनोहर गुडदे, जयसेन प्रल्हाद गुडदे, रमेश सोपान लबडे** यांना भारतीय दंड संहितेचे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, ३४ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केलेच्या आरोपातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) नुसार निर्दोषमुक्त करण्यात येते.

२. आरोपींनी मा. अपेलेट न्यायालयासमोर हजर राहण्यासाठी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४३७–अ अन्वये प्रत्येकी रक्कम रुपये १५,०००/– (अक्षरी रक्कम पंधरा हजार मात्र) प्रत्येकी वैयक्तिक जातमुचलका व जामीनकतबाची पुर्तता यापुर्वीच केलेली आहे. आरोपींचे सदर बंधपत्र सहा महिन्यांच्या कालावधीनंतर रद्द समजण्यात यावे.

३. अपिल कालावधी नंतर जप्त करण्यात आलेली काठी लांबी अंदाजे ३ फुट ९ इंच व दुसरी काठी लांबी अंदाजे ३ फुट ६ इंच मुल्यहीन असल्यामुळे नष्ट करण्यात यावा.

( खुल्या न्यायालयात न्यायनिर्णय घोषित केला )

AMIT SUNIL KOSHTI
Digitally signed by AMIT SUNIL KOSHTI
Date: 2026.05.05 16:39:24 +0530

मालेगांव

( **अ. सु. कोष्टी** )

दिनांक : ०५.०५.२०२६.

प्रथमवर्ग न्यायादंडाधिकारी न्या.क्र.२, मालेगांव.

जिल्हा वाशिम.

## CERTIFICATE

I affirm that, contents of this PDF file is same word to word, as per original Judgment **:-**

| | | |
|---|---|---|
| 1. Name of the Stenographer | :- | **Shivam B.Patange (L.G.)** |
| 2. Court Name | :- | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Malegaon |
| 3. Judgment dated | :- | 05.05.2026. |
| 3. Judgment Signed by the P.O. | :- | 05.05.2026. |
| 4. Judgment uploaded on | :- | 05.05.2026. |